कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२४-२५/९८५
दि. ०५/०८/ २०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

**कला अकादमीची बाल कलाकार राज्यस्तरीय भजन स्पर्धा दि.१२ ऑगस्ट रोजी**

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती बाल कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा सोमवार दि.१२ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी २.३० वाजल्यापासून कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील तीन केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण सहा पथके सहभागी होणार आहेत.

**त्यात श्री शांतादुर्गा बाल भजनी मंडळ, बांदोडा-फोंडा, बाल भवन केंद्र, मडगांव, दाडेश्वर कला केंद्र, नादोडा-बार्देश, श्री शांतादुर्गा जांभळेश्वर सांस्कृतिक संस्था, कळंगुट-बार्देश, सरकारी माध्यमिक विद्यालय, आमोणा-डिचोली व स्वर साधना सांस्कृतिक कला संस्था, माडेल, चोडण-तिसवाडी या पथकांचा समावेश आहे.**

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा-या सहाही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी १२ ऑगस्ट २०२४ रोजी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर कला अकादमी, पणजी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा-या सहाही पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

विभागीय व राज्यस्तरीय बाल कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ५.३० वाजता होणार आहे. याची सर्व विजेत्या पथकांनी व कलाकारांनी नोंद घ्यावी.

सदर भजन स्पर्धा सर्वांसाठी खुली असून भजनप्रेमी रसिकांनी आपली उपस्थिती लावून स्पर्धेतील सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,
८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसएस